# विभागीय कृषि सहसंचालक नाशिक.विभाग नाशिक कार्यालय

*अश्विनी बॅरेक्स, विभागीय महसूल आयुक्त कार्यालयाशेजारी, नाशिकरोड - ४२२१०१*

दुरध्वनी क्र.०२५३-२४६८३६१/६२ ई-मेल-jdanskest@gmail.com


## कृषि सेवक भरती-२०१९ अंतिम निवडयादी

### -: निवेदन :-

नाशिक विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरतीकरीता जाहिरात क्रमांक विकृसस/ नाशिक/आस्था-३ /जाहिरात/२०१८-१९/१४ नाशिक दिनांक ०३/०१/२०१९ नुसार दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०१९ रोजी महा ऑनलाईन व्दारे विविध केंद्रावर परिक्षा घेण्यात आली होती.

त्या परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांची अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी, अंतरिम निवडयादी व अंतरिम प्रतिक्षा यादी दिनांक दिनांक ११ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती व त्या अनुषंगाने दिनांक २९ नोव्हेंबर २०१९ व ३० नोव्हेंबर २०१९ या कालावधीत अंतरिम निवडयादीतील व प्रतिक्षायादीतील उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची या कार्यालयाचे स्तरावर पडताळणी करण्यात आली होती. सदर दिनांकास गैरहजर असलेल्या उमेदवारांना दूरध्वनीव्दारे संपर्क करण्यात आला आहे. या कार्यालयाच्या स्तरावर उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीच्या अनुषंगाने, अंतरिम निवडयादीवर प्राप्त आक्षेप/निवेदनांचा प्रचलित शासन निर्णयानुसार विचार करून, कागदपत्र पडताळणीस गैरहजर उमेदवार वगळून तसेच विभागीय निवड समितीच्या मान्यतेने अंतिम निवडयादी तयार करून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांस, आरक्षणा संबंधीत विभागामार्फत फेर तपासणीमध्ये अपात्र ठरविल्यास, त्या उमेदवाराचे नाव सदर अंतिम निवडयादी मधुन वगळण्याचे तथा अंतिम निवडयादीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा.विभागीय कृषि सहसंचालक नाशिक यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेला आहे.

२) समांतर आरक्षणातील उपलब्ध न झालेले उमेदवार संबंधीत विभागाच्या मान्यतेअंती प्रचलित नियमानुसार प्रतिक्षाधिन उमेदवारांमधुन भरण्यात येतील. प्रतिक्षायादी स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

३) एकाच भरती प्रक्रियेतील कृषि सेवकांचा नियुक्ती आदेश कधी निर्गमित झाला हे लक्षात न घेता कृषि सहाय्यक कर्मचाऱ्यांची जेष्ठता त्यांचे कृषि सेवक स्पर्धा परिक्षेतील गुण व सेवाप्रवेश नियम १९७५ मधील नियम ९(२) मधील तरतुदीनुसार निश्चीत करण्यात येईल.

४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८१ए/१६-ब दिनांक ४ जुलै २०१९ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाचे आरक्षण हे १६ टक्यावरून १३ टक्के करणेत आल्याने, सदर प्रवर्गातील पदांच्या संख्येत घट होऊन सदर पदे १५ वरून १२ करण्यात आली आहेत. तसेच मा.प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेला मुळ अर्ज क्रमांक ११९७/२०१९ च्या निकालाच्या अनुषंगाने निवडयादीवर परिणाम संभवण्याची शक्यता आहे याची सदर प्रवर्गातील निवडयादीतील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) सदर यादी उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे व महापरिक्षा पोर्टलकडे सादर केलेल्या आवेदन पत्रामधील माहितीच्या आधारे व महापोर्टलने दिलेल्या गुणवत्ता यादीनुसार तयार करण्यात आली आहे. तसेच पेसा क्षेत्रातील उमेदवारांच्या अंतरिम निवडयादीवर घेण्यात आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने महापरिक्षा कक्षाकडुन Do You applied to ST PESA Vacancies या रकान्याच्या समावेश करून सुधारीत गुणवत्ता यादी प्राप्त करून घेण्यात आली आहे त्या अनुषंगाने पेसा क्षेत्रातील अंतरिम निवडयादीमधून काही उमेदवरांचे नाव वगळून, त्या उमेदवारांचा नॉनपेसा क्षेत्रातील अंतिम निवडयादीत योग्य त्या ठिकाणी गुणवत्तेनुसार समावेश करण्यात आला आहे. अंतरिम गुणवत्ता यादीत समावेश असलेल्या परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांची यादी कारणासह सोबत जोडल्याप्रमाणे, प्रसिद्ध करण्यात येत आहे. संबंधीत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

६) सदर अंतिम निवडयादी ही विभागीय निवड समितीच्या मान्यतेने प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ:- नाशिक रोड-४२२१०१.
दिनांक:- १० फेब्रुवारी २०२०

Divisional Joint Director of Agriculture, Nasik. Division, Nasik

(संजीव गोवर्धन पडवळ)
विभागीय कृषि सहसंचालक
नाशिक विभाग नाशिक